सचिन माळींच्या कविता संग्रहाच्या निमित्ताने

चन्द्रशेखर पुरन्दरे

'गुलाम नाही, योद्धे होतायत' या कविता संग्रहाचे धाडस केल्याबद्दल प्रथम मी सचिन माळींचे अभिनंदन करतो. धाडस अशा अर्थी की शाब्दिक भाषा हे संवादाचे साधन म्हणून एव्हाना पुरेसे विटलेले आहे हे माझे वैयक्तिक मत आहे. अगदी क्रांतिकारी संकल्पना, धक्के देणारे वाक्प्रयोगही गुळगुळीत आणि घसरडे झाले आहेत. त्यात भर म्हणून बोलणारा एका अर्थाने शब्द वापरतो, ऐकणारा त्याच्या अर्थाने ते बोलणे समजावून घेतो. मग निखळ संवादापेक्षा संदिग्धता वाढते आणि अशी संदिग्धता हेच साहित्याचे लक्षण असावे इथपर्यंत वाङ्मयीन विचार आता पोचला आहे. अशा परिस्थितीत आपले म्हणणे मांडण्यासाठी माळी भाषा हे माध्यम वापरतात आणि यशस्वीपणे वापरतात. त्यांची कोणतीच कविता मुद्दा संदिग्ध ठेवत नाही. जे म्हणायचे ते माळी पोटतिडकीने म्हणतात आणि त्यांचे म्हणणे वाचकापर्यंत त्याच तीव्रतेने पोचते.

मी या कविता संग्रहावर इहवादी भूमिकेतून लिहीत आहे. हे त्यांच्या कवितांचे परीक्षण नाही. लेखाचा उद्देश मुद्द्यांवर थोडीफार चर्चा व्हावी, त्या चर्चेची चळवळीला मदत व्हावी व चळवळ पुढे जावी हा आहे. टीका हा हेतू नाही. ज्यांना माझो चित्रांच्या किंवा इतर लिखाणांच्या संदर्भातील काम माहिती आहे, त्यांना याबाबत संदेह नसावा.

'इहवादी' हा शब्द मी काय अर्थाने वापरतो, त्याचा खुलासा करतो. मानवी समाजातील विषमता समजून घेण्यासाठी कोणत्याही आध्यात्मिक किंवा धार्मिक विचारसरणीची मला आवश्यकता वाटत नाही. या भूमिकेला अनुसरून कोणतीही व्यक्तिपूजा मी नाकारतो. मग ती व्यक्ती दंतकथेतला 'देव' असो, अर्धऐतिहासिक 'प्रेषित' असो, ऐतिहासिक 'संत' असो किंवा अर्वाचीन सामाजिक-राजकीय नेता असो. माझ्या इहवादी दृष्टिकोनातून ही सगळी माणसेच होती. म्हणजेच, ती त्यांच्या स्थळ काल विशिष्ट परिस्थितीची निर्मिती होती. त्यांच्यात असामान्यत्व असेल पण सामान्यत्वही येते. त्यामुळे त्यांच्या उक्तींना किंवा विचारांना त्रिकालाबाधित सत्याचे स्थान देणे मला अयोग्य वाटते.

याचा अर्थ असा निश्चितच नाही की मला अशा व्यक्तींबद्दल आदर नाही. पण आदर असतो तो तेवढ्या विचाराच्या उंचीचा. हा मुद्दा विवेचनात पुढे स्पष्ट होईल.

मी या कवितांकडे पारंपारिक साहित्यमूल्यांच्या किंवा सौंदर्यशास्त्राच्या कसोटीवर पाहत नाही. कला हे प्रामुख्याने संवादाचे साधन आहे. सौंदर्याच्या अभिव्यक्तीचा त्यातील भाग फार किरकोळ आहे अशा माझ्या धारणा आहेत. म्हणून प्रस्थापित साहित्यमूल्यांचा मापदंड या कवितासंग्रहाला लावणे अप्रस्तुत आहे.

या कवितांचे दलित वाङ्मयातील स्थान काय याही दृष्टीने मी पाहत नाही. कोणत्याही कलाकृतीवर 'अमुक एक' असा शिक्का मारून ती कप्पेबंद करणे मला अनुचित वाटते. वर म्हटल्याप्रमाणे भाषेच्या त्रुटीमुळे दलित साहित्य ही एक व्यक्तीसापेक्ष संदर्भचौकट तयार होते. म्हणजे, मी ज्याला दलित साहित्य म्हणेन, त्याला दुसरा दलित साहित्य म्हणेलच असे नाही. मग या चौकटीत काय बसते आणि काय बसत नाही, हा उहापोहच वाढतो. समजा, मला धार्मिक वाङ्मयात रस नाही. पण म्हणून मी संत वाङ्मयच न वाचणे बरोबर नाही. याहून महत्त्वाचा पण संलग्न मुद्दा म्हणजे कोणतेही साहित्य 'कोणासाठी' हे पहावे लागेल. लेखक, कवी, चित्रकार फक्त स्वत:च्या अभिव्यक्तीसाठी कलानिर्मिती करत नाही. तसे असते, तर चित्रकार चित्रे काढेल आणि घरातल्या भिंतीवर टांगेल - प्रदर्शनात मांडणार नाही. लेखक पुस्तक लिहील आणि स्वत: पारायणे करेल - प्रकाशक शोधणार नाही.

मग दलित साहित्याचा लेखकाला अपेक्षित वाचकवर्ग कोण? माझ्यामते हा अपेक्षित वाचक पाच टक्के जर दलित वाचक असेल तर पंच्याण्णव टक्के अदलित वाचक असतो.

दलितांच्या वेदना, त्यांच्यावरील ऐतिहासिक व वर्तमान अन्याय आणि हा अन्याय करणाऱ्या परंपरा, संस्था, वर्ग यांच्यावरील टीका अदलितांपर्यंत पोचवणे हा या साहित्याचा उद्देश असतो. पण या साहित्याला दलित साहित्य म्हटले, की नेमका हाच उद्देश मारला जातो.

एक सामाजिक चित्रकार म्हणून या संदर्भात माझ्या कामाचे उदाहरण देतो. माझ्या चित्रांचे विषय नंदीग्राम, जगातले निरक्षर, इराक युद्धाचे बळी असे असतात. आता नंदीग्रामचे विस्थापित, आफ्रिकेतील निरक्षर किंवा इराकी माझी चित्रे पाहतील याची सुतराम शक्यताही नाही आणि माझी ती अपेक्षाही नाही. मग ही चित्रे कोणासाठी? तर ही चित्रे ज्यांनी ही परिस्थिती निर्माण केली, त्यांच्या निषेधार्थ असतात. आपण सगळे, जे या व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवत नाही आणि आवाज उठवत नाही म्हणून मूक संमती देतो अशा आपल्या सगळ्यांसाठीही असतात. याला जोडून अस्मितेचा जरा सूक्ष्म मुद्दा येतो. मी दलित आहे किंवा भारतीय आहे म्हणून जगातील इतर अन्यायाची दखल न घेणे चूक आहे. माझी अस्मिता एकांगी असली तर मी कलावंत

व्हायला अपुरा पडतो. जिथे जिथे अन्याय आहे, तिथे तिथे माझ्या कलेद्वारे मी आक्रोश केला पाहिजे. का? तर व्यवस्थेच्या बळींना स्वत:चा आवाज नाही. त्यांची व्यथा उर्वरित समाजापर्यंत पोचवणे हे कलाकाराचे कर्तव्य असावे. कलाकार फारतर माध्यम असावा, त्याने प्रेषिताची झूल पांघरू नये. माळी हीच भूमिका भारतीय समाजाच्या संदर्भात बजावतात आणि प्रेषिताचा अभिनिवेश घेत नाहीत ही दिलासा देणारी गोष्ट आहे.

कलेवरच्या शिक्कामोर्तबाकडे परत वळू. मी राहतो त्या युरोपमध्ये किंवा भारतात माझी चित्रकला 'बहिष्कृत' कला या सदरात मोडते. मला त्याचा खेद नाही पण त्यामुळे व्यवस्थेतील संवेदनशील प्रेक्षकही अशा कलेकडे वळत नाही हा माझा अनुभव आहे. म्हणून माळींच्या साहित्यावर एव्हाना दलित साहित्य हा शिक्का पडला नसावा अशी माझी आशा आहे. माळींच्या कविता अशा संकुचित व्याख्या ओलांडतात. नमुन्यादाखल 'शाहीर' ही कविता घेऊ.

Richard Lovelace नावाचा सतराव्या शतकातला एक इंग्लिश कवी होता. १६४२ साली राजकीय आरोपाखाली लंडनमध्ये तुरुंगात असताना त्याने एक कविता लिहिली. कवितेचे नाव - To Althea : from Prison या कवितेतील एक कडवे असे -

Stone walls do not a prison make
nor iron bars a cage
Minds innocent and quiet take
that for an hermitage

म्हणजे, दगडी भिंती किंवा लोखंडी दारांनी तुरुंग बनत नाहीत. मुक्त मन या बंधनांच्या पलीकडे असते किंवा विसाव्या शतकातल्या एका हिंदी कवीचे म्हणणे पाहू - मेरे सपनों को चाहे सूली पर चढा दो तुम। बेइमान समय के लिए मैं अपना अहम् नहीं बेचूँगा।

'शाहीर' ही कविता या जातकुळीतील आहे.

म्हणून या कवितांकडे मी वेगळ्या प्रकारे पाहतो. कोणत्याही कलावंताचे स्वत:चे अनुभवविश्व अत्यंत मर्यादित असते. ते वेदनांनी भरलेलेही असेल पण त्याचा सामाजिक संदर्भ कलाकृतीत येणे आवश्यक असते. माळींच्या प्रत्येक कवितेत हा संदर्भ येतो. कधी आशा म्हणून येतो, कधी उद्वेग म्हणून येतो, बहुधा संताप म्हणून येतो.

या उद्रेक मूल्यांबरोबरच त्यांच्यामागची गृहीते तपासणे आवश्यक असावे. याबाबत एक मुद्दा जरा काळजीपूर्वक तपासावा लागेल. तो म्हणजे, कलाकाराच्या भूमिकेमध्ये अंतर्विरोध असावा की नसावा. म्हणजे, एका चित्रात मी स्त्री अबला दाखवली आणि दुसऱ्या चित्रात ती सत्तांध दाखवली तर वरवर पाहता हा अंतर्विरोध वाटेल पण मी जर सत्ता कशी भ्रष्ट करते हे दाखवत असेन, तर दोन्ही चित्रांत संगती आहे. एकात सत्तेचा बळी आहे, दुसऱ्यात सत्ताधीश आहे. माळींच्या कवितांमध्ये अंतर्विरोध निराळ्या प्रकारे पुढे येतो आणि माझ्या मते तो टाळता येण्यासारखा आहे. माळींच्या स्वत:च्या भूमिकेत विसंगती नाही. ते व्यवस्थेवर अनेक अंगांनी टीका करतात, ज्या आदर्शवादांवर आधारित ही टीका आहे ते स्पष्ट आहेत. उदाहरणार्थ, टीका भांडवलशाहीवर असेल, ब्राह्मणशाहीवर असेल किंवा 'धरमाच्या तंद्रीत' मधल्या धर्मांवर असेल. पण यांच्याविरुद्ध भूमिका सबळ करण्यासाठी माळी आपल्या बाजूने अनेकांना उभे करतात. माझ्या मते व्यवस्थेविरुद्ध त्यांनी फक्त कवी म्हणून स्वत: एकट्याने उभे रहावे. व्यवस्थेविरुद्ध असंतोष व्यक्त करायला आपल्या 'बाजूच्या' किंवा 'विरोधी' व्यक्तींच्या निर्देशाची आवश्यकता नसते. या निर्देशामुळे विद्रोह हे माळींच्या कवितेचे ध्येयच बोथट होते. कसे ते पाहू.

प्रथम मार्क्सवादाचे उदाहरण घेऊ. कार्ल मार्क्सवरच्या कवितेत रशियाच्या अस्ताचा उल्लेख आहे. रशियाचा अस्त, विघटन व नंतरचे अराजक भांडवलशाहीने, अमेरिकन साम्राज्यवादाने किंवा जागतिकीकरणाने केले नाही. एकेकाळची ही महासत्ता हां हां म्हणत लयाला गेली ती अंतर्गत कारणांनी. क्रांतीपासून निदान ब्रेझनेवपर्यंत राजवट तर मार्क्सवादावर आधारित होती ती पत्याच्या घरांसारखी अल्पावधीत कोसळली.

मार्क्सवादाच्या दुसऱ्या राजवटीत, चीनमध्ये एकाधिकारशाही आली. गेल्या वीस वर्षांतील तीस-पस्तीस कोटी लोकांना दारिद्र्यरेषेवर आणले गेले ते काही मार्क्सवादाने नाही. त्याचबरोबर, या संपन्नतेची किंमत ज्यांनी मोजली त्यांना आज तेथे विरोधाचीही मुभा नाही. पर्यावरणाच्या हानीबद्दल आवाज उठवला तर देशद्रोहाच्या आरोपाखाली वर्षानुवर्षे तुरुंगात काढावी लागतात. ऑलिपिंक नको - स्वच्छ हवा द्या, अशी मागणी केली तर अटक होते किंवा तिसरे अगदी आपल्या घरातले नंदीग्रामचे उदाहरण पहा. तीस वर्षे सत्तेवर असणारे मार्क्सवादी सरकार प्रोलेटरिॲटच्याच गळ्याला नख लावते.

मग अशा प्रक्रियांकडे पाहणारा कोणीही सामान्य माणूस म्हणेल की या आदर्शवादातच गफलत आहे. 'सामान्य' माणूस हा शब्दप्रयोग महत्त्वाचा, कारण कविता त्याच्यासाठी आहेत. आता, रशियाने किंवा चीनने किंवा पश्चिम बंगाल सरकारने मार्क्सचे पोथीबद्ध आचरण केले का नाही हा अगदी पुस्तकी विषय होतो.

त्यावर संशोधकांनी विद्यापीठात पीएचडी मिळवणे ठीक आहे, पण काव्यात 'मार्क्स' असा व्यक्तिदर्शक उल्लेख आला की माळींचेच म्हणजे कमकुवत होते.

दुसरे एक व्यक्तिनिष्ठ उदाहरण घेऊ. समजा मी म्हणालो

की मला शेक्सपिअर आवडतो. मला खरेतर असे म्हणायचे असते की मला शेक्सपिअरची सहा नाटके शैलीसाठी आवडतात. दहा नाटके आशयासाठी आवडतात, आठ नाटकांतील प्रत्येकी एक-दोन विशिष्ट पात्रे आवडतात. मला काही संपूर्ण शेक्सपिअर शब्दश: आवडतो असे नसते. पण वाचणाऱ्याने नेमक्या मला न आवडणाऱ्या नाटकांची नावे उद्धृत केली आणि असली नाटके लिहिणारा शेक्सपिअर पुरन्दरेंना आवडतो, असे विधान केले तर मला 'हो'ही म्हणता येत नाही आणि 'नाही'ही म्हणता येत नाही. उगाच खुलासे मात्र करावे लागतील. परत, माळी ज्यांची नावे उद्धृत करतात (उदा. 'शाहीर' कवितेतील नावे), त्यांची एकत्र मोट बांधायची झाली तर एक समान धागा मारून मुटकून शोधावा लागेल. तेवढेच नव्हे, तर खोलात जाऊन या प्रत्येकाच्या साहित्याचा कीस काढला तर अनेक अंतर्गत विसंगती आढळतील. मग 'शाहीर'ची 'ही' कविता अभिप्रेत आहे का 'ती' कविता अभिप्रेत आहे - असे निष्कारण फाटे फुटत राहतील. मुळात, माझ्या मते या नामोल्लेखाच्या खटाटोपांचीच जरूरी नाही. माळींची भूमिका स्पष्ट आहे, या दाखले देण्याच्या मोहाने ती दुबळी होते. आणखी एक विचार या कविता वाचल्यावर माझ्या मनात येतो. तो म्हणजे आजचे विस्थापित, आजचे सर्वहारा उद्याचे प्रस्थापित झाले तर ते आजच्या प्रस्थापितांसारखेच वागण्याची शक्यता लक्षात घ्यायला हवी. आणि सर्वहाराची व्याख्याही स्थल-काल-सापेक्ष असते. ती workers of the world, unite इतकी एकमितीय राहिलेली नाही.

या वर्षीच्या एप्रिल-मे मधल्या दक्षिण आफ्रिकेतील घटनेचा आढावा घेऊ. झिंबाब्वे, मालावी, नायजेरिया अशा आफ्रिकेतील इतर देशांतून अनेक गरीब लोक उपजीविकेसाठी दक्षिण आफ्रिकेत आलेले आहेत. यातील काही हजार लोक जोहान्सबर्ग या राजधानीजवळ झोपडपट्ट्यात कसेबसे राहतात. त्यांच्याच आजूबाजूला तितक्याच दारिद्र्यात राहणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या रहिवाशांनी यांच्यावर हल्ले केले. त्यात कित्येक लोक मेले आणि दक्षिण आफ्रिकाभर उसळलेल्या 'परकीयां'विरुद्धच्या दंगलींमुळे अडीच लाख लोक बेघर झाले, कित्येक हजार परत कसेबसे, जीव वाचवण्यासाठी मायदेशी परतू लागले. दक्षिण आफ्रिकेतील ज्या लोकांनी हा हिंसाचार केा, ते तिथले सर्वहाराच. फक्त ते तद्देशीय आणि बळी परदेशी. पण तद्देशीय आणि प्रस्थापित म्हणून वागले. किंवा हा लेख लिहिपर्यंतच्या म्हणजे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंतच्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचे उदाहरण घेऊ. डेमोक्रॅटिक पक्षाच्या अंतर्गत निवडणुकीत हिलरी क्लिंटन आणि बराक ओबामा यांच्यात कमालीची चुरस आहे. क्लिंटन महिला तर ओबामा कृष्णवर्णीय. केवळ याच मुद्द्यांवर ही चुरस पाहता दोघेही आजवरच्या अमेरिकन राजकारणातील उपेक्षित गटांचे प्रतिनिधी. पण यातील कोणीही उद्या राष्ट्राध्यक्ष झाला तरी अमेरिकेचे उर्वरित जगाबद्दलचे धोरण काही आमूलाग्र बदलणार नाही. कारण आजचे हे उद्या प्रस्थापित झाले, की सत्तेच्या तर्कशास्त्रानेच चालणार आणि ते तर्कशास्त्र जातपात-वर्ण-वंश या सगळ्यांनाच पुरून उरते. राजकीय कलाकृतीत हे भान असावे. त्याचे पुसटसे प्रतिबिंब कवितांच्या अंत:प्रवाहात जाणवते. लेखाच्या शेवटी हा मुद्दा स्पष्ट केला आहे.

आता परत उद्रेक मूल्याकडे वळू. प्रस्थापिताला सतत आव्हान देणे निकडीचे असते कारण सत्तेचे गणित विस्थापितांचे/उपेक्षितांचे/सर्वहारांचे प्रस्थापितांत रूपांतर करू शकते. म्हणून हे आव्हान कलावंताने द्यायचे असते. प्रस्थापित म्हणजे फक्त सत्ताधीश किंवा उच्चवर्णीय नव्हेत. प्रस्थापित म्हणजे स्थितिप्रियता. जैसे थे राहणे. चळवळ गतिप्रिय असते. चळवळीची व्याख्याच गतिप्रियता गृहीत धरते. कलावंताचा आविष्कार उत्स्फूर्त असतो. म्हणून त्याला चळवळीची गतिप्रियता आवडते आणि तो समाजाच्या स्थितिप्रियतेवर हल्ला करतो.

आदर्शवाद ही जरा निसरडी संकल्पना आहे. जोवर तो चळवळीचे ध्येयवाद म्हणून वावरतो, तोवर आदर्शवाद गतिप्रियता दाखवतो. पण जरा निरखून पाहता आदर्शवादाला खरी अभिप्रेत असते ती नव्या व्यवस्थेत बदलानंतर येणारी स्थितिप्रियता. त्यामुळे चळवळींमध्ये ही स्थितिप्रियता येते. माळींना याची जाणीव आहे. (पार्टी नावाची करंटी नाव) माळींच्या कवितांमध्ये आपल्या चळवळीला नजीकच्या भविष्यात ही स्थितिप्रियता येईल का याची व्याकुळता एका बाजूला आहे. दुसऱ्या बाजूला कलावंत म्हणून गतिप्रियतेची उर्मी आहे. त्यातील त्यांची ओढाताण, तडफड हे त्यांच्या कवितेचे यश आहे.

चन्द्रशेखर पुरन्दरे
Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com

❐